# बी. ए. भाग ३ सत्र ५ इतिहास पेपर १० Political History of the Marathas या पेपरमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेले उपघटक

## घटक क्र. १

## उपघटक क्रमांक व उपघटकाचे नाव

## A. Establishment of Karvir State

## करवीर राज्याची स्थापना

छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५९ मध्ये पन्हाळा जिंकून घेऊन कोल्हापूर व आसपासच्या प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले. पण कोल्हापूरला खऱ्या अर्थाने राजकीय महत्त्व महाराणी ताराबाई यांच्या काळात प्राप्त झाले. महाराणी ताराबाईंनी औरंगजेबाबरोबर सन १७०० ते सन १७०७ पर्यंत असा सात वर्षे लढा दिला. हा लढा चालू असतानाच औरंगजेबाचा मृत्यू झाला. तेव्हा त्याच्याबरोबर असलेल्या मुलाने आजमशहाने स्वत:ला बादशहा म्हणून घोषित केले आणि उत्तरेकडे जाताना औरंगजेबाच्या नजरकैदेत असलेल्या छत्रपती संभाजीपुत्र शाहू यांची ८ मे १७०७ रोजी 'दोराहा' येथे सुटका केली.

छत्रपती शाहू महाराज महाराष्ट्रात येताच त्यांनी ताराबाईंकडे स्वराज्याची सत्ता सूत्रे मागितली. पण महाराणी ताराबाई यांनी त्यास नकार दिला. त्यामुळे छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यातील वाद वाढत गेला. परिणामी, १२ ऑक्टोबर १७०७ रोजी पुण्याजवळील 'खेड' येथे ताराबाई—शाहू यांच्या लढाई झाली. यात ताराबाईंच्या पक्षाचा पराभव झाला. छत्रपती शाहूंनी जानेवारी १७०८ मध्ये सातारा येथे स्वत:ला राज्याभिषेक करुन घेतला तर महाराणी ताराबाईंनी कोल्हापूर भागात आपले वर्चस्व निर्माण केले आणि नोव्हेंबर १७१० मध्ये पन्हाळगडावर दुसरे मराठी राज्य स्थापन केले. हेच 'करवीर राज्य' होय.

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याची दोन राज्ये झाले. छत्रपती शाहू महाराजांनी सातारा—अजिंक्यतारा येथे तर महाराणी ताराबाई यांनी करवीर राज्याची राजधानी पन्हाळगडावर स्थापन केली. महाराणी ताराबाईंनी आपला मुलगा करवीर छत्रपती शिवाजी महाराज पहिले (जन्म ९ जून १६९६) यांचा पन्हाळगडावर राज्याभिषेक केला पण ते अल्पवयीन असल्याने या छत्रपतींच्या नावाने महाराणी ताराबाई राज्य कारभार पाहत होत्या. अशा प्रकारे करवीर राज्याची स्थापना महाराणी ताराबाईंनी केली.

## घटक क्र. २

## उपघटक क्रमांक व उपघटकाचे नाव

## D. Peshwa-Karvir-Nizam relations –

## पेशवा—करवीर—निजाम संबंध—

सातारचे छत्रपती शाहू महाराज, करवीर छत्रपती संभाजी महाराज पहिले व हैद्राबादचा निजाम या तीनही सत्ता थोड्या फार फरकाने उदयास एकाच वेळी आल्या होत्या. यामध्ये सन १७०८ मध्ये सातारा, सन १७१० मध्ये करवीर (कोल्हापूर) व सन १७१३ मध्ये हैद्राबाद येथे निजामाची नेमणूक झाली. सन १७१३ मध्ये बाळाजी विश्वनाथ याची शाहू महाराजांनी पेशवेपदी नेमणूक केली. सन १७१४ मध्ये करवीर राज्यात पन्हाळा येथे सत्तांतर घडून आले. महाराणी ताराबाई व त्यांचे पुत्र करवीर छत्रपती शिवाजी पहिले यांना कैद करुन राजसबाईंनी आपला मुलगा करवीर छत्रपती संभाजी पहिले यांना करवीर राज्याच्या गादीवर बसवले.

पेशवा बाळाजी विश्वनाथने छत्रपती शाहू महाराजांची सत्ता स्थिर करण्याचा प्रयत्न केला. पण पेशवा बाळाजी विश्वनाथ अल्पावधीतच मरण पावला. बाळाजीनंतर त्याचा पुत्र बाजीराव सन १७२० मध्ये पेशवा झाला. या काळातच निजाम पुन्हा दक्षिणेत आला. बाजीराव आणि निजाम हे दोघेही एकाच वेळी दक्षिणेकडे वर्चस्व निर्माण करु पाहत होते. पण बाजीराव असेपर्यंत निजाम मराठ्यांवर वर्चस्व निर्माण करु शकला नाही.

सातारा व करवीर छत्रपतींमध्ये सुरुवातीला सख्य नव्हते आणि त्याच वेळी बाजीराव—निजाम यांच्यातही सख्य नव्हते. याचा फायदा निजामाने घेऊन करवीर छत्रपतींशी मित्रत्वाचे संबंध निर्माण केले होते आणि करवीर छत्रपतींचा उपयोग पेशव्याविरुद्ध करुन घेतला. याचा अर्थ बाजीराव हाच निजामाचा एकमेव शत्रू होता. जेव्हा जेव्हा बाजीराव व निजाम यांच्यात लढाया झाल्या, तेव्हा तेव्हा बाजीरावाने निजामाचा पराभव केला होता. त्यामुळे निजाम बाजीरावाविरुद्ध इतर कारस्थाने करु लागला. यामध्ये करवीर छत्रपती संभाजींना हाताशी धरुन मराठी राज्यात दुही निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता. पण पालखेडच्या लढाईत बाजीरावाने निजामाचा पराभव केल्याने संभाजी महाराजांना निजाम नंतर आमिष दाखवू शकला नाही.

छत्रपती शाहूंना दक्षिणेकडे चौथाई वसूल करण्याचा हक्क अगोदरच मिळाला होता. पण यात निजामाने तिडा निर्माण केला. कारण दक्षिणेचे राजकारण आपल्यामार्फत चालावे असे निजामाला वाटत होते. तेव्हा शाहू महाराजांनी बाजीरावाला कर्नाटक मोहिमेवर पाठवले. तेव्हा त्यांनी निजामाशी तडजोड केली होती. पण बाजीरावाच्या वाढत्या सामर्थ्याला शह देण्यासाठी निजामाने करवीर छत्रपती संभाजींना जवळ केले होते. दोन्ही छत्रपतींमधील संबंध कसे बिघडतील व या भाऊबंदकीचा फायदा आपणास कसा करुन घेता येईल हे निजाम पाहत होता.

करवीर छत्रपती संभाजी पहिले व निजाम यांच्यात मध्यस्थी करणारा चंद्रसेन जाधव होता. त्यानेच सन १७१४ च्या कोल्हापूर राज्यातील सत्तांतरानंतर छत्रपती शाहूंच्या विरोधात निजामाच्या लष्करी मदतीचे आमिष दाखवून संभाजी महाराजांना निजामाच्या गटात सामिल व्हायला लावले. दोन्ही मराठी राज्यात दुही कमी व्हावी असे शाहू महाराजांना वाटत होते. म्हणून शाहू महाराजांनी संभाजी महाराजांची राजमाता राजसबाईंमार्फत समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण शाहू महाराजांना यामध्ये यश आले नाही.

उलट निजाम, चंद्रसेन जाधव व संभाजीराजे यांची आघाडी बळकट झाली होती. त्यामुळे अनेक मराठा सरदार निजामाला जाऊन मिळाले होते. तर निजामानेही शाहूंऐवजी संभाजीराजांना मराठ्यांचा राजा मानण्याचे ठरवले होते. पण बाजीरावाने पैठणजवळील पालखेड येथे २९ फेब्रुवारी १७२८ रोजी निजामाचा पराभव केला. त्या पराभवाने निजामाचा बिमोड झाल्याने संभाजी महाराजांची बाजू लंगडी पडली. पालखेडच्या लढाईनंतर संभाजी महाराजांनी सातारा—कोल्हापूर राज्यातील संघर्ष मिटवण्याचा प्रयत्न केला व यातूनच १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह घडून आला होता.

## घटक ३

## उपघटक क्रमांक व उपघटकाचे नाव

# D. Contribution of Chhatrapati Sambhaji II and Maharani Jijabai of Karvir.

## D. करवीर छत्रपती संभाजी दुसरे व महाराणी जिजाबाई यांचे योगदान.

महाराणी ताराबाई यांनी करवीरचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. या राज्याला १७३१ च्या तहाने छत्रपती शाहू महाराजांनी मान्यता दिली. पुढे बाजीरावाच्या मृत्यूनंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेबांकडे पेशवे पद देण्यात आले. नानासाहेबाने करवीर छत्रपती संभाजी यांच्याबरोबर सन १७४० मध्ये एक गुप्त करार केला होता. या करारानुसार कोल्हापूर व सातारा या दोन गाद्या एक करुन मराठी राज्य बळकट करण्याचा प्रयत्न केला.

छत्रपती शाहू महाराज (सातारा) यांच्या मृत्यूनंतर करवीर छत्रपती संभाजी महाराज यांना सातारच्या गादीवर बसवण्याचा विचार नानासाहेबाचा होता. पण पुढे पेशवा तसा वागला नाही किंवा संभाजी महाराजांना सातारच्या गादीवर बसवण्यास शाहू महाराजांचा विरोध होता असे दिसते.

छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर ताराबाईंनी आपला नातू रामराजा यांना सातारच्या गादीवर बसवले. पण ते आपल्या म्हणण्याप्रमाणे वागत नाहीत म्हटल्यावर रामराजांविरुद्ध कांगावा सुरु केला. याचवेळी रामराजांना काढून संभाजी महाराजांना सातारा गादीवर बसवणे पेशवा नानासाहेबाला शक्य होते. पण ताराबाईंचे पुन्हा वर्चस्व संभाजी महाराज व महाराणी जिजाबाईंनाही नको होते. म्हणून त्यांनीही यास नकार दिला.

करवीर छत्रपती संभाजी महाराजांना सातारा गादीवर बसवण्यात नानासाहेबाला अपयश आले असले तरी संभाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत पेशव्याने सलोख्याचे संबंध ठेवले होते. नानासाहेब पेशवा सन १७५४ मध्ये कर्नाटक मोहिमेवर जाताना त्याने संभाजी महाराज व महाराणी जिजाबाई यांची भेट घेतली होती. तर मोहिमेवरुन पुण्याला जाताना महाराणी जिजाबाईंना पेशव्याने बरोबर नेले होते. याचा अर्थ पेशव्याने मराठी राज्यातील

दुही नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान १८ डिसेंबर १७६० रोजी संभाजी महाराजांचे निधन झाले.

संभाजी महाराजांच्या निधनानंतर मात्र पेशव्याने महाराणी जिजाबाईंचा विश्वासघात केला. जिजाबाईंचे सांत्वन करायचे सोडून कोल्हापूर राज्य खालसा करण्यासाठी पेशव्याने फौजा पाठवल्या होत्या. पण महाराणी जिजाबाई या महाराणी ताराबाई इतक्याच कर्तबगार होत्या. म्हणूनच करवीर राज्य खालसा करण्यासाठी आलेल्या पेशव्याचा जिजाबाईंनी पराभव करुन राज्याचे रक्षण केले.

करवीर महाराणी जिजाबाई या पराक्रमी, कर्तबगार व मुत्सद्दी होत्या. म्हणूनच करवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या निधनानंतर करवीर राज्याचे रक्षण केले होते. याशिवाय करवीर गादीचा प्रश्न सोडवण्यासाठी त्या स्वत: समर्थ होत्या. कारण पती संभाजी महाराजांच्या मृत्यूवेळी सवत महाराणी कुसाबाई या गरोदर होत्या. जर त्यांना मुलगा झाला तर राज्याला वारस होईल असे जिजाबाईंना वाटत होते. त्यामुळे कोल्हापूर राज्यात पेशव्याचा अनाठायी हस्तक्षेप होऊ दिला नाही. पण दैव योगाने कुसाबाईंना मुलगी झाली. तरी जिजाबाईंनी मुलगा झाल्याची बातमी पसरवली. कारण पेशव्याला करवीर राज्य खालसा करण्याची संधी मिळू नये हाच या मागे हेतू होता.

महाराणी जिजाबाई यांच्या मुत्सद्देगिरीमुळे करवीर राज्य टिकून राहिले. नव्हे संभाजी राजांच्या हयातीतच त्या राज्य कारभार पहात होत्या. त्यांनी आपल्या नावाचा शिक्का तयार करुन घेतला होता. छत्रपतींच्या राजघराण्यात स्वत:च्या नावाने शिक्का तयार करणाऱ्या करवीर महाराणी जिजाबाई या पहिल्याच महाराणी होत्या.

## घटक ४

## उपघटक क्र. व उपघटकाचे नाव

# D. Chhatrapatis of Karvir and the British

## 'करवीर छत्रपती व ब्रिटीश'

करवीर छत्रपतींना आपल्या राज्याच्या आवती—भोवती असणाऱ्या सरदारांचा व राज्यांचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांच्याशी कटू प्रसंग निर्माण होत. यामध्ये इचलकरंजीचे घोरपडे, सावंतवाडीकर व सिधोजीराव निपाणीकरांचा समावेश होता. यांच्यापैकी कोल्हापूरच्या सुरक्षिततेला सर्वात मोठा धोका सिधोजीराव निपाणीकरापासून होता. करवीर छत्रपतींना निपाणीकराचा बंदोबस्त करण्यासाठी कोणाच्या तरी मदतीची आवश्यकता होती. ही अडचण इंग्रजांनी बरोबर ओळखली. तर याच सुमारास इंग्रजांना पश्चिम किनारपट्टीवर वर्चस्व निर्माण करायचे होते.

पश्चिम किनारपट्टीवर वर्चस्व निर्माण करायचे असेल तर सिंधुदूर्ग किल्ला इंग्रजांना आपल्याकडे हवा होता. हा किल्ला करवीर छत्रपतींच्या ताब्यात होता. जर आपण सिधोजीरावाचा बंदोबस्त केला तर सिंधुदूर्ग किल्ला करवीर छत्रपती आपणास देतील असे इंग्रजांना वाटले. याचवेळी करवीर छत्रपती शिवाजी दुसरे यांनाही एखाद्या मित्राची गरज होती. इंग्रजांच्या मदतीने सिधोजीरावाचा बंदोबस्त करता येईल म्हणून शिवाजी दुसरे यांच्याशी एल्फिन्स्टनने बोलणी केली व १ ऑक्टोबर १८१२ रोजी तह घडवून आणला. या तहाने सिंधुदूर्ग, राजकोट, पद्‌मगड व सर्जेकोट ही ठिकाणे इंग्रजांना देण्यात आली होती.

१८१२ च्या तहा अगोदर इंग्रजांनी छत्रपती शिवाजी दुसरे यांच्याबरोबर १२ जानेवारी १७६६ रोजी एक तह केला होता. या तहानुसार कोल्हापूर राज्य व ब्रिटीश यांच्यात कायमची दोस्ती निर्माण केली. त्यासाठी छत्रपतींचा वकिल मुंबई येथे ठेवण्याचे ठरले होते. याशिवाय २५ नोव्हेंबर १७९२ रोजी आणखी तह शिवाजी दुसरे व इंग्रज यांच्यात झाला होता. पुढे सन १८२६ मध्येही छत्रपती शहाजी महाराज व इंग्रज यांच्यात तह झाला. यानुसार छत्रपती व इंग्रज यांच्यातील वाद दूर करुन पुन्हा मैत्री निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.

या सर्व तहांमध्ये १८१२ चा तह जास्त जाचक होता, कारण त्या तहातील प्रत्येक कलमाने छत्रपतींच्या सत्तेला मर्यादा पडत गेल्या. सिंधुदूर्ग व त्या भोवतालचा प्रदेश इंग्रजांना मिळाला. यामुळे करवीर आरमार संपुष्टात आले. व या तहामुळे करवीर छत्रपतींच्या शौर्यशाली परंपरेला बऱ्याच मर्यादा आल्या. या तहानंतरच्या कालखंडात कोल्हापूर (करवीर) हे स्वतंत्र राज्य न राहता इंग्रजी सत्तेच्या संरक्षणाखालील एक संस्थान बनले.